REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 12 | ISSUE - 8 | MAY - 2023

# "संरक्षण-यंत्रणा आणि संपादन"–एक सहसंबंधात्मक अध्ययन

डॉ. जी. व्ही. जैन
(माजी सहाय्यक प्राध्यापक), शिववैभव शिक्षण महाविद्यालय, वर्धा.




प्रत्येक व्यक्ती आपली प्रतिमा उजळ ठेवण्याचा, प्रतिष्ठा टिकविण्याचा व वाढविण्याचा सहज प्रयत्न करीत असते. एखादी चूक झाली, दोष माथी घेऊ लागला, अपयश व अपमानाचे क्षण आले की ही चूक आपली नव्हे, आपण दोषी नाही, हे मुळीच आपले अपयश नव्हेच हे दाखविण्याचा प्रयत्न व्यक्ती करते, चुक किंवा दोष इतरांचा आहे, जे घडले त्याला परिस्थिती जबाबदार आहे, आपण योग्य असेच वर्तन केले, इत्यादी प्रकारांनी वर्तनाचे समर्थन केले जाते, चूक वा दोष न स्वीकारता आपल्या वर्तनाचे समर्थन करण्याच्या अनेक युक्त्या प्रयुक्त्या व पध्दती योजिल्या जातात. अशा पध्दतींना संरक्षण-यंत्रणा (Defence mechanism) म्हणतात. कारण ही ढाल वापरून त्या व्दारा व्यक्ती आपला बचाव करण्याच्या निरनिराळया प्रकारे प्रयत्न करीत असतो.उदा. कृतक समर्थन, प्रक्षेपण, विस्थापण, प्रतिपूरण, तादाम्य, विकृतश्रध्दा, आत्मतांडव, नकारात्मकता, आजारीपणाचे सोंग घेणे इ. हे सर्व संरक्षण यंत्रणेचे प्रकार आहेत.

हया संरक्षण-यंत्रणाचा उपयोग आपण सर्वजण नकळत करीत असतो. मर्यादीत प्रमाणात असतील तर हानिकारक ठरत नाहीत पण याचा अतिरेक झाला की, मानसिक विकृतीमध्ये त्याचे रूपांतर होते. मनुष्य वस्तुस्थितीचा विचार न करता आपल्या उणिवा झाकण्याचा आणि आपली प्रतिष्ठा सावरण्याचा प्रयत्न या उपयांनी नेहमी करीत असेल तर यश मिळणार नाही. वैफल्य निर्माण होईल आणि यामधून गंभीर विकृती निर्माण होईल म्हणून संरक्षण-यंत्रणेचा वापर कितपत करणे योग्य आहे हे जाणून घेणे आवश्यक आहे. म्हणूनच 'संरक्षण- यंत्रणा आणि संपादन'- एक सहसंबंधात्मक अध्ययन, या विषयाची संशोधनाकरीता निवड केली आहे.

## विषयाचे महत्व :-

विद्यार्थी शिकत असतांना आपल्या शिक्षकाकडून बचाव करण्यासाठी अनेक प्रकारच्या संरक्षण-यंत्रणाचा वापर करतात, विद्यार्थी आपला बचाव करण्यासाठी संरक्षण-यंत्रणेचा वापर करतात पण हे बचाव कार्य काही प्रमाणात ठिक आहे. पण याचा अतिरेक झाला तर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनावर फार विपरित परिणाम होण्याची शक्यता असते आणि वैफल्य निर्माण होत असते. म्हणजेच विद्यार्थी स्वत:च्या दोषावर सतत पांघरूण घालण्याचा प्रयत्न करीत असतात.

तात्पर्य असे की, विद्यार्थी शिक्षण ग्रहण करीत असतांना संरक्षण-यंत्रणेचा वारंवार उपयोग करून आपला बचाव करण्याचा प्रयत्न करतो काय? आणि हया त्याच्या सततचा बचाव कार्याचा विपरीत परिणाम त्याच्या शैक्षणिक संपादनावर होतो काय? हे विसरून चालणार नाही.

## संशोधनाची आवश्यकता :-

शिक्षणक्षेत्र म्हटले की विद्यार्थी असतातच आणि प्रत्येक शाळेतील विद्यार्थी हे वेगवेगळया प्रकारचे असतात. त्याचप्रमाणे माध्यमिक शाळेतील विद्यार्थी अनेक प्रकारचे असतात. काही हुशार, काही मध्यम तर काही मंद बुध्दिचे असतात आणि यामध्ये बरेचसे संरक्षण–यंत्रणेचा वापर करणारे असतात.

शाळेत उशिरा येणे, मधल्या सुट्टीतून पळून जाणे, इतरांना त्रास देणे, शिस्त न पाळणे, शिक्षकांशी व विद्यार्थ्यांशी अरेराविणे वागणे अशा प्रकारच्या वागण्याचे कारण शिक्षकाने विचारले असता, आईने बाजारात पाठविले होते, मधल्या सुट्टीतून पळून जाण्याचे कारण विचारले असता पोट दुखत होते, इतरांना त्रास देण्याचे कारण विचारले असता त्यानेच अगोदर मला त्रास दिला असे सांगणे यावरून आपणास असे आढळून येईल की, प्रत्येक गोष्ट विद्यार्थी लपविण्याचा प्रयत्न करतो, म्हणजे आपल्या दोषांवर पांघरून घालत असतात. याचे कारण काय? हे शोधून काढण्यासाठी हा विषय संशोधनासाठी निवडला.

## संशोधन विषयाचे शीर्षक :-

"संरक्षण यंत्रणा आणि संपादन" – एक सहसंबंधात्मक अध्ययन.

## कार्यात्कम पदांच्या व्याख्या :-

१. ***संरक्षण–यंत्रणा*** – चूक वा दोष न स्विकारता आपल्या वर्तनाचे समर्थन करण्याच्या अनेक युक्त्या प्रयुक्त्या व पध्दती योजिल्या जातात. अशा पध्दतीला संरक्षण–यंत्रणा म्हणतात. आपला दोष इतरांवर टाकणे किंवा लादणे म्हणजेच संरक्षण–यंत्रणा होय.

२. ***संपादन*** – शाळेत किंवा महाविद्यालयात ठरविलेल्या अभ्यासक्रमानुसार साधारणपणे काही मुदतीत घेतलेल्या शालेय परिक्षेतील कृतीचे वर्णन करून त्यांची प्रमाणबध्द अशी श्रेणी ठरविणे म्हणजे संपादन होय.

## संशोधनाची उद्दिष्टये :-

प्रस्तूत संशोधनाची उद्दिष्टये खालीलप्रमाणे –

१. ग्रामीण भागातील आणि शहरी भागातील शाळेतील विद्यार्थ्यांची संरक्षण– यंत्रणा आणि शैक्षणिक संपादन यातील सहसंबंध शोधणे.
२. ग्रामीण भागातील शाळेतील मुलींची संरक्षण–यंत्रणा आणि शैक्षणिक संपादन यातील सहसंबंध शोधणे.
३. ग्रामीण भागातील शाळेतील मुलांची संरक्षण–यंत्रणा आणि शैक्षणिक संपादन यातील सहसंबंध शोधणे.
४. ग्रामीण भागातील शाळेतील मुला–मुलींची संरक्षण–यंत्रणा त्याचे शैक्षणिक संपादन यातील सहसंबंध शोधणे.
५. शहरी भागातील शाळेतील मुलींची संरक्षण–यंत्रणा आणि शैक्षणिक संपादन यातील सहसंबंध शोधणे.
६. शहरी भागातील शाळेतील मुलांची संरक्षण–यंत्रणा आणि शैक्षणिक संपादन यातील सहसंबंध शोधणे..
७. मुलांच्या आणि मुलींच्या संपादनाची तुलना करणे.

## संशोधनातील परिकल्पना :-

१. ग्रामीण भागातील आणि शहरी भागातील शाळेतील विद्यार्थ्यांची संरक्षण- यंत्रणा आणि शैक्षणिक संपादन यांचा लक्षणिय सहसंबंध आढळून येत नाही.
२. ग्रामीण भागातील मुलींची संरक्षण-यंत्रणा आणि शैक्षणिक संपादन यांचा लक्षणिय सहसंबंध आढळून येत नाही.
३. ग्रामीण भागातील शाळेतील मुलांची संरक्षण-यंत्रणा आणि शैक्षणिक संपादन यांचा लक्षणिय सहसंबंध आढळून येत नाही.
४. ग्रामीण भागातील शाळेतील मुलां-मुलींची संरक्षण-यंत्रणा आणि शैक्षणिक संपादन यांचा लक्षणिय सहसंबंध आढळून येत नाही.
५. शहरी भागातील शाळेतील मुलींची संरक्षण-यंत्रणा आणि शैक्षणिक संपादन यांचा लक्षणिय सहसंबंध आढळून येत नाही.
६. शहरी भागातील शाळेतील मुलांची संरक्षण-यंत्रणा आणि शैक्षणिक संपादन यांचा लक्षणिय सहसंबंध आढळून येत नाही.
७. शहरी भागातील शाळेतील मुलां-मुलींची संरक्षण-यंत्रणा आणि शैक्षणिक संपादन यांचा लक्षणिय सहसंबंध आढळून येत नाही.
८. मुलांच्या आणि मुलींच्या संपादनात लक्षणिय फरक नसतो.

## प्रस्तुत संशोधनातील न्यादर्श :-

हिंगणघाट शहरातील ३ माध्यमिक शाळा आणि ३ ग्रामिण भागातील माध्यमिक शाळा आणि हया शाळेतील इयत्ता ९ व्या वर्गातील ३०० विद्यार्थ्यांचा समावेश संशोधन कार्यासाठी म्हणजे ३०० विद्यार्थ्यांची निवड न्यादर्श म्हणून केली आहे.

### न्यादर्शाची तपशिलवार माहिती :-

| अ.क्र. | शाळेचे नांव | वर्ग | मुले | मुली | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | **शहरी विभाग** | | | | |
| १. | सिध्दार्थ विद्यालय, हिंगणघाट. | ९वा | ३५ | १५ | ५० |
| २. | विकास विद्यालय, हिंगणघाट. | ९वा | १७ | ३३ | ५० |
| ३. | डॉ. बी. आर. आंबेडकर, विद्यालय, हिंगणघाट. | ९वा | २४ | २६ | ५० |
| | **ग्रामीण विभाग** | | | | |
| १. | लोकसेवा विद्यालय, सावली (वाघ), ता. हिंगणघाट. | ९वा | ३० | २० | ५० |
| २. | श्री संत साईबाबा विद्यालय, बुरकोणी, ता. हिंगणघाट. | ९वा | २६ | २४ | ५० |
| ३. | आदर्श माध्यमिक विद्यालय, सेलू (मूरपाड), ता. हिंगणघाट. | ९वा | ३० | २० | ५० |
| | **एकूण ६ शाळा** | | **१६२** | **१३४** | **३००** |

## संशोधनाची साधने/माहितीचे संकलन :-

प्रस्तुत संशोधनात विद्यार्थ्याकडून संरक्षण-यंत्रणेशी संबंधित प्रश्नावली करून घेण्यात आली. प्रश्नावलीत होय/अनिश्चित/नाही असे पर्याय दिलेले होते. योग्य वाटेल अशा पर्यायावर वर्तुळ (०) करण्यात सांगण्यात आले. संरक्षण-यंत्रणा मापिका तयार करतांना सोबतच उत्तरपत्रिका तयार केली.

उत्तरपत्रिकेत होय/ अनिश्चित/नाही अशा तीन पर्याय तयार करण्यात आल्या आणि विधानांशी विद्यार्थी सहमत होतील त्यावर(०)अशी खुन करायला सांगितले अशाप्रकारे संरक्षण-यंत्रणा मापिका इयत्ता नवव्या वर्गातील ३०० विद्यार्थ्याकडून भरून घेतली. संरक्षण-यंत्रणा मापिका भरण्यासाठी वेळेचे बंधन नव्हते. साधारण: २५ मिनिटात सोडविण्यासारखी होती.

## प्रश्नावलीचे गुणांकन :-

इयत्ता नवव्या वर्गातील विद्यार्थ्याकडून संरक्षण-यंत्रणा मापिका भरून घेतल्या नंतर प्रत्येक विधानाबाबत अनुकूल निदर्शक असणाऱ्या प्रतिक्रियासाठी विद्यार्थ्यांना सर्वात जास्त गुण देण्यात आले.

अनुकूल विधानाला

| | | |
|---|---|---|
| होय | - | २ |
| अनिश्चित | - | १ |
| नाही | - | ० |

अशा प्रकारे गुणांकन केल्यानंतर त्यांना मिळालेल्या गुणांची बेरीज केली त्यानंतर त्यांचा सहसंबंध काढण्यात आला.

## माहितीचे विश्लेषण :-

विद्यार्थ्यांची संरक्षण-यंत्रणा आणि शैक्षणिक संपादन या संबंधित माहितीचे विश्लेषण माध्यमान, प्रमाण विचलन, सहसंबंध, टी परिक्षण हया संख्याशास्त्रीय परिमाणाच्या आणि तंत्राच्या आधारे करण्यात आले.

## प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष :-

१. ग्रामिण आणि शहरी भागातील मुला-मुलींची संरक्षण-यंत्रणा आणि शैक्षणिक संपादन यांच्यात ऋणात्मक सहसंबंध आहे.
२. ग्रामीण भागातील शाळेतील मुलींची संरक्षण-यंत्रणा आणि शैक्षणिक संपादन यांच्यात सहसंबंध नाही.
३. ग्रामीण भागातील शाळेतील मुलांची संरक्षण-यंत्रणा आणि शैक्षणिक संपादन यांच्यात सहसंबंध नाही.
४. ग्रामिण भागातील शाळेतील मुला-मुलींची संरक्षण-यंत्रणा आणि शैक्षणिक संपादन यांच्यात ऋणात्मक सहसंबंध आहे.
५. शहरी भागातील शाळेतील मुलींची संरक्षण-यंत्रणा आणि शैक्षणिक संपादन यांच्यात ऋणात्मक सहसंबंध आहे.
६. शहरी भागातील शाळेतील मुलांची संरक्षण-यंत्रणा आणि शैक्षणिक संपादन यांच्यात ऋणात्मक सहसंबंध आहे.
७. शहरी भागातील शाळेतील मुला-मुलींची संरक्षण-यंत्रणा आणि शैक्षणिक संपादन यांच्यात ऋणात्मक सहसंबंध आहे.
८. ग्रामिण भागातील शाळेतील मुलींच्या आणि मुलांच्या संरक्षण-यंत्रणा आणि शैक्षणिक संपादन यांच्यात कोणताच सहसंबंध नाही.

## संदर्भ ग्रंथसूची :-


१. आकोलकर, ग.वि., (जून.१९७३), शैक्षणिक तत्वज्ञानाची रूपरेषा, श्री विद्या प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे.

२. आफळे,रा.रा.बापट, भा.वे., (१९७८),शिक्षणाचे मानसशास्त्रीय अधिष्ठान, श्री विद्या प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे.

३. दांडेकर,वा. ना., (१९८९),शैक्षणिक मुल्यमापन व संख्याशास्त्र, श्री विद्या प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे.

४. Garrett, Henry.E., (1966), Staties in phychology and Education, vakils fetter and simons.L.T.D. Bombay

५. कुलकर्णी, के. वि., (१९८२), शैक्षणिक मानसशास्त्र, श्री विद्या प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे.

६. मुळे,रा. श., उमाटे, वि.तु., (१९८७),शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती.

७. उपासनी, ना. के., कुलकर्णी, के.वि., (१९८७),'नवे शैक्षणिक मूल्यमापन आणि संख्याशास्त्र', श्री विद्या प्रकाशन, पुणे.